**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
**शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि १**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.
**दिनांक :- १५ जून, २०१३**

वाचा :-

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १ दिनांक ०४ जानेवारी, २०१३

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६ दिनांक १९ जानेवारी, २०१३

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३

४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३

५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५७, ५८ व ५९ दिनांक २० एप्रिल, २०१३

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र २००९ / (६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२

**प्रस्तावना -**

राज्यातील सर्व शाळांना **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व नवीन

खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देताना **हेतुपत्र** (Letter of Intent) **व शाळा मान्यता प्रमाणपत्र** (Letter Of Approval) ची पध्दती स्वीकारावी असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने CBSE, ICSE इत्यादी बोर्डांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

२. कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे यासाठी शासनाने सन २०१३ मध्ये **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** पारित केला असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त ७,१०८ अर्जाची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ अर्जांना पात्र करण्यात आलेले आहे. या पात्र प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय -**

(१) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ७१०८ प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे २४१७ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण प्राप्त प्रस्ताव | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | ६,१२१ | १,९७७ | ४,१४४ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ९८७ | ४४० | ५४७ |
| एकूण | | ७,१०८ | २,४१७ | ४,६९१ |

(२) **शाळा दर्जावाढीच्या** ४४० पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबतची **परवानगी** देण्यात येत आहे.

(३) **नवीन शाळांचे प्रस्ताव** - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या १९७७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उपरोक्त संबधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापनांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित सक्षम अधिका-यांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता १ली पासून परवानगी देण्यात येईल.

(५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

(६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील त्याचप्रमाणे **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिरित्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

(८) सोबतच्या विवरपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबातची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन / दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 201306151740421921-असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश ढुबे)

**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

Kuldeep Mashi I/G R Self Finance 13 06 2013

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पता | माध्यम | नवीन शाळा / दर्जा वाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| ६३१ | पुणे | श्री छत्रपती संभाजी शिक्षण संस्था, घोडनदी ता. शिरुर जि.पुणे. | विजयमाला विद्यामंदिर घोडनदी ता.शिरुर जि.पुणे | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६३२ | पुणे | एस.ए. एज्युकेशनल ट्रस्ट, तुंगा गाव साकी विहार रोड, मुंबई | शिवाजीराव वाळुंज इंग्लिश मिडीयम स्कूल, आव्हाट, ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६३३ | पुणे | भिगवण शिक्षण प्रसारक मंडळ, भिगवण, ता.इंदापूर | कोंडीराम सदाशिव क्षीरसागर इंग्लिश मिडीयम स्कूल. भिगवण, ता.इंदापूर | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६३४ | पुणे | श्री दत्तकृपा शैक्ष. व कृषी ग्राम विकास प्रतिष्ठाण घारगाव ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर | श्री आनंतराव जगताप इंग्लिश मेडियम स्कुल (सी.बी.एस.ई) मांडगाव फराटा ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६३५ | पुणे | श्री. भास्कराचार्य प्रतिष्ठान, औरंगाबाद | बी.एच. (भागाबाई हनुमंराव) चाटे प्रायमरी स्कूल, गाऊडदरा | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६३६ | पुणे | एस.एस.पी. शिक्षण संस्था, दापोडी पुणे-१२ | गणेश इंटरनॅशनल स्कुल चिखली ता. हवेली | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६३७ | पुणे | गेनबा सोपानराव मोझे संस्था, येरवडा, पुणे-६ | नारायणराव गेनबा मोझे प्रायमरी इंग्लिश् मिडीयम स्कूल, धानोरी, पुणे-१५ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६३८ | पुणे | विश्वभारती प्रतिष्ठान, दत्तवाडी, पुणे-३० | विश्वभारती इंग्लिश मिडीयम स्कूल, धायरी, पुणे-४१ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६३९ | पुणे | ज्ञानसाई शिक्षण प्रसारक मंडळ, आळंदी देवाची, ता.खेड | श्रीमती भित्राबाई सोपानराव उपाध्ये इंग्लिश मिडीयम स्कूल. आळंदी देवाची, मरकळ रोड, ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६४० | पुणे | श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ पारवडी ता, बारामती जि.पुणे. | कै. जिजाबाई दादासाहेब गावडे मराठी प्राथमिक शाळा , परवडी ता. बारामती जि.पुणे. | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६४१ | पुणे | बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ, जातेगाव ता. शिरुर जि.पुणे | मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा,रामलिंग रोड ता. शिरुर जि.पुणे | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६४२ | पुणे | पसायदान ग्रामविकास संस्था ता. शिरुर जि.पुणे | पसायदान गुरुकुल प्राथमिक शाळा ज्ञानदिपनगर ता. शिरुर जि.पुणे | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६४३ | पुणे | सदाशिव मोहळकर शिक्षण संस्था जंक्शन ता. इंदापूर जि.पुणे. | कलावती मोहळकर प्राथमिक शाळा जंक्शन ता. इंदापूर जि.पुणे. | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |

**Regarding granting the permission for the establishment of new schools as well as upgradation of status of existing schools for the academic year 2013-14 on self-financing basis under the Maharashtra Self-financing Schools (Establishment and Regulation) Act, 2012 ....**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

Department of School Education and Sports

**Government Resolution No. SwayamA-2013/(85/13)MaShi 1**

Hutatma Rajguru Chowk, Madam Kama Road,

Ministry (Extension), Mumbai – 400 032.

**Date: - 15th June, 2013**

**Read:** - 1) Government of Maharashtra Extra Ordinary Gazette No. 1 Dated 04th January, 2013

2) Government of Maharashtra Extra Ordinary Gazette No. 6 Dated 19th January, 2013

3) Government Resolution No. PraShaTu – 1112 / (258/2012) / PraShi – 3, Dated 13th February, 2013 of Department of School Education and Sports

4) Government of Maharashtra Extra Ordinary Gazette No. 5 Dated 22nd February, 2013

5) Government of Maharashtra Extra Ordinary Gazette No. 57, 58 and 59 Dated 20th April, 2013

6) Government Resolution No. NaHaPra – 2009 / (663/09) / MaShi – 1, Dated 20th June, 2012 of Department of School Education and Sports

Preamble -

**The Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009** has been implemented in all schools in the state. Accordingly, a policy decision has been taken to adopt the method of issuing of a **Letter of Intent and Letter of Approval** while approving all New Private Pimary, Secondary and Higher Secondary Schools in the State. Accordingly, a detailed procedure has been laid down as per Government Resolution dated June 20, 2012 for granting permission on permanent unaided basis and no objection certificate to English Medium Schools of CBSE, ICSE etc.

From Page No. 4 and 5 (Point No. (6)

NOTARY GUNDU KERBA SUTAR PUNE DIST. (MAHARASHTRA) REGD. NO. 9991 EXP.DATE 26/7/2028 GOVERNMENT OF INDIA

TRANSOLUTIONS PUNE

(6) The new / permitted for upgrading the status of schools shown in the accompanying statement will be bound to follow the procedures of the Government's orders issued from time to time as well as all the provisions of the **Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009** as well as the **Maharashtra Self-financing Schools (Establishment and Regulation) Act, 2012.**

(7) It will be necessary to personally inform the concerned applicant by the Member Secretary of the Scrutiny Committee of the concerned district along with the details of the ineligible proposals for setting up a new school or upgradation of the status of an existing school as per the district wise details shown in the accompanying statement and the acknowledgment thereof should be kept in the government office.

(8) While filling the information in District wise DISE Data regarding the new / permitted for upgradation of the status of the schools shown in the accompanying statement, it will be necessary to record the number in a separate category as permitted schools on self-financing basis. Further action in this regard should be taken by the State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai. Similarly, for the information of all concerned, it will be necessary to display on a public notice board outside the school that the school has been approved on the basis of self- financing basis and permitted for upgradation of the status of the schools.

The above said Government Resolution is available on the Government of Maharashtra's website www.maharashtra.gov.in. and its computer code number is 2013061517404219321. This order is being authenticated with digital signature

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Sign illegible/-
(Prakash Thube)
**Joint Secretary, Government of Maharashtra**

Copy to,

Director of Education, (Secondary & Higher Secondary) Maharashtra State, Pune.

Director of Education, (Primary) Maharashtra State, Pune.

NOTARY GUNDU KERBA SUTAR PUNE DIST. (MAHARASHTRA) REGD. NO. 9991 EXP.DATE 26/7/2028 GOVERNMENT OF INDIA

ATTESTED BY
GUNDU KERBA SUTAR
NOTARY GOVT. OF INDIA
PUNE DISTRICT (MAHARASHTRA)
REGN. NO. 9991

TRANS SOLUTIONS PUNE

| Enclosure to the Government Resolution No. SwayamA-2013/(85/13)MaShi 1 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| S.N. | District | Name of the Applicant Institution | Name of the Proposed School and Address | Medium | New School / Upgradation in Status | The final decision of the Government after considering the recommendation of the Scrutiny Committee and the objections / suggestions / demur received thereon | Type of the School |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 631 | Pune | Shri Chhatrapati Sambhaji Shikshan Sanstha, Ghodnadi, Ta: Shirur, Distt: Pune. | Vijaymala Vidyamandir Ghodnadi, Tah: Shirur, Distt: Pune. | Marathi | New School | Eligible | Primary |
| 632 | Pune | S.A. Educational Trust, Tunga Village, Saki Vihar Road, Mumbai | Shivajirao Walunj English Medium School, Awhat Ta: Khed | English | New School | Eligible | Primary |
| 633 | Pune | Bhigwan Shikshan Prasarak Mandal, Bhigwan, Ta: Indapur | Kondiram Sadashiv Kshirsagar English Medium School, Bhigwan, Ta: Indapur | English | New School | Eligible | Primary |
| 634 | Pune | Shri Dattakrupa Shaikshnik va Krushi Gram Vikas Pratishthan, Ghargaon, Ta: Shrigonda, Distt: Ahamadnagar | Shree Anantrao Jagtap English Medium School (C.B.S.E.) Mandgaon Farata, Ta: Shirur, Distt: Pune | English | New School | Eligible | Primary |
| 635 | Pune | Shri Bhaskaracharya Pratishthan, Aurangabad | B.H. (Bhagabai Hanumantrao) Chate Primary School, Gaudara | English | New School | Eligible | Primary |
| 636 | Pune | S. S. P. Shikshan Sanstha, Dapodi, Pune – 12 | Ganesh International School, Chikhali, Ta: Haveli. | English | New School | Eligible | Primary |
| 637 | Pune | Genba Sopanrao Moze Sanstha, Yerwada, Pune - 6 | Narayanarao Genba Moze Primary English Medium School, Dhanori, Pune – 15 | English | New School | Eligible | Primary |
| 638 | Pune | Vishwabharati Pratishthan, Dattawadi, Pune - 30 | Vishwabharati English Medium School, Dhayari, Pune – 41 | English | New School | Eligible | Primary |
| 639 | Pune | Dnyansai Shikshan Prasarak Mandal, Alandi Devachi, Ta: Khed | Mrs. Bhitrabai Sopanrao Upadhyay English Medium School, Alandi Devachi, Markal Road, Ta: Khed | English | New School | Eligible | Primary |

NOTARY GUNDU KERBA SUTAR PUNE DIST. (MAHARASHTRA) REGD. NO. 9991 EXP.DATE 26/7/2028 GOVERNMENT OF INDIA

TRANSOLUTIONS PUNE

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 640 | Pune | Shri Bhairavnath Shikshan Prasarak Mandal, Parwadi, Ta: Baramati, Distt: Pune | Late Jijabai Dadasaheb Gawde Marathi Primary School Parwadi, Ta: Baramati, Distt: Pune | Marathi | New School | Eligible | Primary |
| 641 | Pune | Balaji Shikshan Prasarak Mandal, Jategaon, Ta: Shirur, Distt: Pune | Marathi Medium School, Ramling Road, Ta: Shirur, Distt: Pune | Marathi | New School | Eligible | Primary |
| 642 | Pune | Pasaydan Gramvikas Sanstha, Ta: Shirur, Distt: Pune | Pasaydan Gurukul Primary School, Dnyandeepnagar, Ta: Shirur, Distt: Pune | Marathi | New School | Eligible | Primary |
| 643 | Pune | Sadashiv Mohalkar Shikshan Sanstha, Junction, Ta: Indapur, Distt: Pune | Kalavati Mohalkar Primary Schoon, Junction, Ta: Indapur, Distt: Pune | Marathi | New School | Eligible | Primary |

Sign illegible/-

TRANSOLUTIONS PUNE

NOTARY GUNDU KERBA SUTAR PUNE DIST. (MAHARASHTRA) REGD. NO. 9991 EXP.DATE 26/7/2028 GOVERNMENT OF INDIA

ATTESTED BY

GUNDU KERBA SUTAR
NOTARY GOVT. OF INDIA
PUNE DISTRICT (MAHARASHTRA
REGN. NO. 9991

09 SEP 2023

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm2.sesd-mh@gov.in


क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.७११/एसएम-२ दिनांक:- १३ एप्रिल, २०२३

## मान्यता पत्र

प्रति,

अध्यक्ष / सचिव,

एस. एस. पी. शिक्षण संस्था, दापोडी, पुणे-१२.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**एस. एस. पी. शिक्षण संस्था, दापोडी, पुणे संचलित गणेश इंटरनॅशनल स्कूल, गट क्र.११५८, ११५९, ११६०, चिखली, हवेली, जि.पुणे.**

संदर्भ-१. इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.७११/एसएम-२, दि. ०४.१०.२०२१.

२. राज्यस्तरीय प्राधिकरण तथा आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.शिसं/माध्य/स्वयंअर्थ/२०२२-२३/एस-४/१५४१, दि. २७.०३.२०२३.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **एस. एस. पी. शिक्षण संस्था, दापोडी, पुणे** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून **गणेश इंटरनॅशनल स्कूल, गट क्र.११५८, ११५९, ११६०, चिखली, हवेली, जि.पुणे** या प्राथमिक ते उच्च प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक ते उच्च माध्यमिक **(इ. ८ वी ते इ. १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा)**शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरीता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून **एस. एस. पी. शिक्षण संस्था, दापोडी, पुणे संचलित गणेश इंटरनॅशनल स्कूल, गट क्र.११५८, ११५९, ११६०, चिखली, हवेली, जि.पुणे** या प्राथमिक ते उच्च प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक ते उच्च माध्यमिक **(इ. ८ वी ते इ. १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा)** शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरीता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता सदर दर्जावाढ करण्याची मान्यता, पुढील अटी व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे.

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तीचे आणि या

३) अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तीचे पालन करणे अनिवार्य आहे.

४) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

५) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

६) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

७) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

८) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

९) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

१०) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

११) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "**स्वयंअर्थसहाय्यित शाळा**" अशी माहिती भरतील व **यु.डी.आय.एस.इ.** क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

१२) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "**स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा**" असा फलक लावतील.

१३) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

प्र.ह. पडोळे

(प्रदिप पडोळे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७. निवड नस्ती ( प्र.क्र.७११/२०२१/एसएम-२).

[Three Lion Head Seal of Govt. of India]

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

Department of School Education and Sports
Ministry (Extension), Chamber No. 432
Madam Kama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai - 32
Telephone No: - Email ID: - sm2.sesd-mh@gov.in

No. SFS–1021/Pra. Kra. 711/SM –2 Date: - 13th April, 2023

**APPROVAL LETTER**

To,
Chairperson / Secretary,
S. S. P. Shikashan Santha, Dapodi, Pune – 12.

Subject: Letter of approval for starting new schools or upgradation of existing schools on self-financing basis under the Maharashtra Self-financing Schools (Establishment and Regulation) Act, 2012 ...

**Ganesh International School, Gat No. 1158, 1159, 1160, Chikhali, Haveli, Distt: Pune, operated by S. S. P. Shikashan Santha, Dapodi, Pune.**

Reference – 1. Intention Letter No. SFS–1021/Pra. Kra. 711/SM –2, dated 04.10.2021.

2.Letter No. ShiSan/Madhya/SwayamArtha/2022-23/S-4/1541, dated 27.03.2023 of the State Level Authority and Commissioner, Education, Maharashtra State, Pune.

An application had been submitted by **S. S. P. Shikashan Santha, Dapodi, Pune** for upgradation of secondary to higher secondary **(class 8th to class 12th English medium, C.B.S.E., all branches)** school on self-financing basis by connecting this **Ganesh International School, Gat No. 1158, 1159, 1160, Chikhali, Haveli, Distt: Pune**, primary to higher secondary school from the academic year 2023-24, under the Maharashtra Self-financing Schools (Establishment and Regulation) Act, 2012.

2. With reference to your application, under the Maharashtra Self-financing Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and Maharashtra Self-financing Schools (Establishment and Regulation) Act, 2020, an intention letter with the terms and conditions had been issued to **Ganesh International School, Gat No. 1158, 1159, 1160, Chikhali, Haveli, Distt: Pune, operated by S. S. P. Shikashan Santha, Dapodi, Pune** for upgradation of secondary to higher secondary **(class 8th to class 12th English medium, C.B.S.E., all branches)** on self-financing basis by connecting this school from the academic year 2023- 24. Now the approval for the above said upgradation is being given subject to the following terms and conditions.

NOTARY GUNDU KERBA SUTAR PUNE DIST. (MAHARASHTRA) REGD. NO. 9991 EXP.DATE 26/7/2028 GOVERNMENT OF INDIA

TRANSOLUTIONS PUNE

3. **Terms and Conditions:**

1) The proposed school shall comply with all the standards, terms and conditions prescribed by the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and the Maharashtra Right to Free and Compulsory Education Rules, 2011 and the directions issued by the Government under this Act and will comply with the standards or authenticities or terms and conditions specified by the Government from time to time.

2) The registered organization or the trust or the company shall comply with all the terms and conditions prescribed by the Maharashtra Self-financing Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and that

3) It is mandatory to comply with the directions issued by the Government or the standards or terms and conditions specified by the Government from time to time under this Act.

4) It is mandatory for the School Managements who are interested in getting affiliation to C.B.S.E. or C.I.S.C.E or C.A.I.E. or I.B. etc. boards as per the instructions given by the government from time to time to obtain a no objection certificate from the government.

5) The School Management will inform the concerned District Education Officer before the commencement of the academic year approved by the government.

6) Permission granted under the provisions of this Act to establish a new school or to upgrade the standard of school shall be for the academic year for which it is granted.

7) If the School Management fails to start the school within 18 months, the approval letter issued will be cancelled.

8) The School Management cannot change the approved medium of the education, location of the school in future, without the permission of the Government.

9) If the School Management establishes a school at a place other than the place approved by the Government, the permission of that school shall be cancelled.

10) It has been provided that the recruitment of teachers and non-teaching staff in self-financed schools should be done in accordance with the prevailing rules and regulations of the government.

NOTARY GUNDU KERBA SUTAR PUNE DIST. (MAHARASHTRA) REGD. NO. 9991 EXP.DATE 26/7/2028 GOVERNMENT OF INDIA

TRANSOLUTIONS PUNE

11) While filling district wise information, the school which has been given permission shall fill the information as **"Self-financing School"** as a separate category and get **U.D.I.S.E.** number. In this connection, State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai has been announced as the Nodal Officer.

12) The School Management will put up a board at the entrance of the school premises as **"Self-financing Approved School"**.

13) The State Government may, at any time, cancel the Letter of Approval on the ground of breach of any of the provisions of this Act or the rules made thereunder or failure to comply with any directions issued under the Act or standards or authenticities or terms and conditions specified by the Government from time to time.

Sign illegible/-

(Pradeep Padole)
Cell Officer, Maharashtra Government.

Copy for information to –

1. Commissioner (Education) Maharashtra State, Pune.
2. State Project Director, Maharashtra Council of Primary Education, Mumbai.
3. Director (Secondary & Higher Secondary) Maharashtra State, Pune.
4. Director (Primary) Maharashtra State, Pune.
5. Divisional Deputy Director of Education, Pune Division, Pune.
6. Education Officer (Primary/Secondary) Zilla Parishad, Pune.
7. Selection Notification File (Pra. Kra. 711/2021/ SM-2).

ATTESTED BY

GUNDU KERBA SUTAR
NOTARY GOVT. OF INDIA
PUNE DISTRICT (MAHARASHTRA
REGN. NO. 9991

09 SEP 2023

NOTARY GOVERNMENT OF INDIA
GUNDU KERBA SUTAR PUNE DIST. (MAHARASHTRA) REGD. NO. 9991 EXP.DATE 26/7/2028

TRANSOLUTIONS PUNE

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL